सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता प्रचार, प्रसिध्दी व प्रशिक्षण या (२४०६ ८५८९) लेखाशीर्षांतर्गत अनुदान वितरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः साववि-२०१९/प्र.क्र.६० /फ-११
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २४ जुलै, २०१९

वाचा :-

१) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्रमांक- अर्थसं-२०१९ /प्र.क.४४ /अर्थ-३, दि.०१.०४.२०१९

२) प्रधान मुख्य वनसरंक्षक सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे पत्र क्र. कक्ष-१/साव/०३/२०१९-२०/४८७/२०१८-१९, दि. २१.०६.२०१९ चे पत्र.

३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक साववि-२०१९/ प्र.क्र.६०/ फ-११, दि. २७.०६.२०१९

४) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक साववि-२०१९/ प्र.क्र.६१/ फ-११, दि. २९.०६.२०१९

५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/ पी./नबाप्र/प्र.क्र.२५/५३२/१९-२० दि. ४.०७.२०१९.

६) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक साववि-२०१९/ प्र.क्र.६०/ फ-११, दि. ०४.०७.२०१९

७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/ पी./नबाप्र/प्र.क्र.२५/६००/१९-२० दि.१२.०७.२०१९.

प्रस्तावना :-

वन व सामाजिक वनीकरणाचे महत्व लक्षात घेऊन वृक्ष लागवड व संवर्धन आणि अन्य योजनांकरिता "प्रचार, प्रसिध्दी व प्रशिक्षण,(२४०६ ८५८९)" या योजनेंतर्गत रु.३०००.००लक्ष इतका निधी (२६ जाहिरात व प्रसिध्दी-रु.२२५०.०० लक्ष + ५० इतर खर्च - रु.७.५० लक्ष) अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

प्रधान मुख्य वनसरंक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य , पुणे यांनी संदर्भ क्रमांक २ येथील पत्रान्वये वर्ष २०१९-२० साठी सादर केलेल्या प्रसिध्दी आराखड्यास (Media plan) संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णय दि.२९.०६.२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

वित्त विभागाच्या दिनांक ८ जुलै २०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार अर्थसंकल्पित रकमेच्या ६० % निधी वितरित करण्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार "प्रचार, प्रसिध्दी व प्रशिक्षण योजनेंतर्गत अर्थसंकल्पित असलेल्यारु. ३०००.०० लक्ष रकमेच्या ६० टक्के रक्कम रु. १८००.०० लक्ष वितरणासाठी उपलब्ध असून त्यापैकी रु. १०००.०० लक्ष निधी संदर्भ क्र. ३ व ६ येथील शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आला आहे. आता रु. ८००.०० लक्ष निधी वितरणासाठी उपलब्ध आहे.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.७ च्या पत्रान्वये रु. ३१२७.६८ लक्ष रकमेचा चालू बाब प्रस्ताव सादर केला आहे. प्रधान मुख्य वनसरंक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सन २०१९ च्या पावसाळयात करावयाच्या ३३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमात जास्तीत जास्त जनतेचा लोकसहभाग मिळविण्याच्या दृष्टीने विविध माध्यमांद्वारे प्रचार ,प्रसार व जाहिरात इ. द्वारे प्रसिध्दी कामे पार पाडावयाची आहेत. त्याअनुषंगाने वितरणासाठी उपलब्ध असलेला रु. ८००.०० लक्ष निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

सन २०१९-२० या वित्तीय वर्षात वन व सामाजिक वनीकरण विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रचार, प्रसिध्दी व प्रशिक्षण (२४०६ ८५८९) या योजनेकरिता प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे रु.८००.०० लक्ष (२६- जाहिरात व प्रसिध्दी रु.६००.०० लक्ष व ५०- इतर खर्च रु.२००.०० लक्ष) इतका निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

४. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर आणि प्रधान मुख्य वनसरंक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत व्हावे.

५. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून खर्ची टाकण्यात यावा.

"मागणी क्र.सी-७,

२४०६ वनीकरण व वन्यजीवन, (कार्यक्रम)

(०१) वनीकरण, ००३, शिक्षण व प्रशिक्षण

(००) (०३) प्रचार, प्रसिध्दी व प्रशिक्षण (२४०६ ८५८९)".

२६ जाहिरात व प्रसिध्दी, ५० इतर खर्च

६ सदर शासन निर्णय संदर्भ क्रमांक १ येथील वित्त विभागाच्या दि. ८ जुलै २०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७२४१६३०५०८८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA
RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.07.24 16:35:58 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)
५. वनसरंक्षक , सामाजिक वनीकरण (६ वृत्त)
६. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)
७. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.
१०. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
११. वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
१२. कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवडनस्ती/फ-११.